**विंधण विहीर कार्यक्रमासाठी आवश्यक असलेला हातपंप, विद्युतपंप, जी.आय. पाईप तसेच हातपंप व विद्युतपंपाचे सुटे भाग यांच्या खरेदीचे अधिकार जिल्हा परिषदांना देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन परिपत्रक क्र. ग्रापापु-१००२/प्र.क्र. ५९१/पापु-०७,
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १ ऑक्टोंबर, २००३.**

**वाचा :-** शासन अधिसूचना पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१०००/प्र.क्र.१०७(१)/पापु-०७, दिनांक १४ नोव्हेंबर, २०००.

**शासन परिपत्रक :**

राज्य शासनाकडील योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्याच्या निर्णयानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडील विंधण विहिर कार्यक्रम, वायुसंपिडक व सुरुंग योजना हे कार्यक्रम महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० नुसार संदर्भिय दिनांक १४.११.२००० च्या अधिसुचनेन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनांनुसार विंधण विहिर कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. हातपंप, विद्युतपंप, जी.आय. पाईप तसेच हातपंप व विद्युतपंपाचे सुटे भाग यांची खरेदी जिल्हा परिषदांनी दरकरारावर करण्याचे बंधन घालण्यात आलेले आहे.

२. त्यानुसार, मागील दोन वर्षात शासन स्तरावरुन दर करार करण्यात आला होता. या दर करारामधील दर, या वस्तुंसाठीच्या त्यापूर्वीच्या दरांपेक्षा व बाजारातील प्रचलित दरापेक्षा तुलनात्मकदृष्ट्या फारच कमी व स्पर्धात्मक होते. परंतु, जिल्हा स्तरावरुन साहित्याच्या खरेदीसाठी योग्यप्रकारे नियोजन न झाल्याने, दर करारावरील पुरवठादारांकडे जिल्हा परिषदांकडून एकाचवेळी पुरवठा आदेश प्राप्त झाले. त्यामुळे दर करारावरील पुरवठादारांकडून साहित्याचा पुरवठा करण्यास विलंब होत होता. दर करारावरील पुरवठादारांकडून साहित्याच्या पुरवठयास झालेल्या विलंबामुळे टंचाई कालावधीत खोदण्यात आलेल्या विंधण विहिरींवर हातपंपाची उभारणी करण्यास काही जिल्हयात विलंब होत होता. त्याचा परिणाम कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर झाल्याचे दिसून आले. या सर्व बाबींचा विचार करुन जिल्हा परिषदांना हा पुरवठा त्यांच्या स्तरावर नियोजन करुन वेळीच उपलब्ध करुन घेणे शक्य व्हावे म्हणून शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-



५८८

अ) विंधण विहीर कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदांना आवश्यक असलेला **हातपंप, विद्युतपंप, जी. आय. पाईप** इत्यादी साहित्य, जिल्हा परिषदांनी विहीत **कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यास शासन परवानगी देत आहे.**

ब) विंधण विहिरीवरील **हातपंप व विद्युतपंपाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे सुटे भाग** जिल्हा परिषदांना **विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यास शासन परवानगी देत आहे.**

क) जिल्हा परिषदांनी अशा प्रकारे साहित्याची खरेदी करताना उपरोक्त साहित्यासाठी संचालकांनी सन २००२-२००३ या वर्षासाठीच्या दर करारामध्ये नमूद केलेल्या वर्णनानुसार व गुणवत्तेनुसार साहित्याची खरेदी योग्यरित्या नियोजन करुन घ्यावी. अशा प्रकारे नियोजन करुन खरेदी करावयाच्या साहित्याची संख्या जिल्हा परिषदांनी निश्चित करुन ती संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांना कळवावी व ती त्यांच्याकडून प्रमाणीत करुन घ्यावी. जिल्हा परिषदांकडून असा प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात संचालकांनी मंजूरी घ्यावी. साहित्याची खरेदी करताना निधीची उपलब्धता विचारात घेऊनच खरेदी करावी. **कोणत्याही परिस्थितीत कमी दर्जाच्या साहित्याची व आवश्यकतेपेक्षा जास्त साहित्याची खरेदी होणार नाही याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी.**

ड) विंधण विहीर कार्यक्रमासाठी आवश्यक असलेले **केसिंग पाईप, ड्रील रॉडस्, सर्व प्रकारचे हॅमर्स व सर्व प्रकारचे बिटस्** हे साहित्य शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक-भांखस-१०८८/(२५१२)/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी, १९९२ नुसार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या यादीमध्ये समाविष्ट असल्यामुळे, **हे साहित्य जिल्हा परिषदांना, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या स्तरावर खरेदी करता येणार नाही.** या साहित्यासाठी दर करार करण्याची विनंती उद्योग संचालनालयास करण्यात आलेली आहे. उद्योग संचालनालयामार्फत या साहित्यासाठी करण्यात येणा-या दरकरारानुसारच सदर साहित्याची खरेदी करण्यात यावी. उद्योग संचालनालयाकडून याबाबींसाठी दर करार होईपर्यंत **शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००२/प्र.क्र.५९१/पापु-०७ दिनांक १५.३.०३ मधील अटीनुसार आवश्यक खरेदी स्थानिकरित्या निविदा मागवून करता येईल.**

इ) जिल्हा परिषदांनी वेळोवेळी केलेल्या खरेदीच्या ओदशाच्या प्रती शासनास व संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे यांना वेळोवेळी पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,



५८८

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव,
३. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, (सर्व)
४. विभागीय आयुक्त, (सर्व)
५. जिल्हाधिकारी, (सर्व)
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१२. उप अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, व सर्व कार्यासन अधिकारी, (पापुवस्ववि)
१५. निवडनस्ती (पापु-०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग



५७८